# अहवाल सत्र २०१५-१६

## राष्ट्रीय सेवा योजना (NSS)

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी त्यांच्या गावालगतच उपलब्ध व्हावी आणि कोणीही शिक्षणापासून वंचित राहू नये या उदात्त हेतूने यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था वर्धा चे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय बापूरावजी देशमुख उपाख्य दाआजी यांनी वर्धा जिल्हयात अनेक शाळा, महाविद्यालयांची स्थापना केली, त्यापैकीच एक म्हणजे देवळी येथील एस.एस.एन.जे.महाविद्यालय. सन १९८४-८५ पासून देवळी परिसरासह लगतच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याचे कार्य अव्याहतपणे करीत आहे. या महाविद्यालयातून शिक्षणासोबतच समाजसेवेची आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी म्हणूनं सन १९८७-८८ पासून राष्ट्रीय सेवा योजना राबविण्यात येत आहे. समाजोपयोगी अनेक उपक्रम या योजनेच्या माध्यमाने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सोबत घेवून राबविले जात आहेत.

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचा शैक्षणिक सत्र २०१५-१६ चा अहवाल महाविद्यालयाच्या स्मरणिकेकरिता सादर करतांना अत्यंत आनंद होत आहे. नियमित कार्यक्रम आणि विशेष श्रमसंस्कार शिबीर अशा दोन विभागांमध्ये वर्षभर चालणा-या कार्यक्रमांची विभागणी करण्यात येते. नियमित घेण्यात येणा-या कार्यक्रमांमध्ये शैक्षणिक सत्राच्या सुरूवातीला दिनांक ११ जुलै २०१४ ला जागतिक लोसंख्या दिवस घेण्यात आला 'लोकसंख्यावाढीचे देशाच्या अर्थकारणावर होणारे दुष्परिणाम' या विषयावर एक चर्चासत्र आयोजित करण्यात आले. दिनांक २६ जुलै ला स्व. दाआजी उपाख्य बापूरावजी देशमुख यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम साजरा करण्यात येतो, या दिवशी गुरूदेव सेवा मंडळाचे प्रचारक श्री. बा.दे.हांडे आणि योग शिक्षक श्री. दामोदरजी राऊत यांच्या उपस्थितीत सामुहिक प्रार्थना घेवून स्व. दाआजींना आदरांजली अर्पण करण्यात आली तसेच रा.से.यो.च्या माध्यमाने महाविद्यालय परिसरात ११ वृक्षांची मान्यवरांच्या हस्ते लागवड करण्यात आली. दिनांक १ ऑगस्टला लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि लोकमान्य टिळक यांचे समाज जागृतीपर कार्य' आणि 'बाजीप्रभू देशपांडे यांचे कर्तृत्व' या विषयावर एक निबंध स्पर्धा घेण्यात आली. दिनांक ९ ऑगस्ट क्रांती दिनाच्या निमित्ताने व्याख्यानाचा कार्यक्रम घेण्यात आला. दिनांक १३ ऑगस्ट जागतिक युवा दिनाच्या निमित्ताने एच.आय.व्ही.जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला. रा.से.यो.च्या रेड-रिबन क्लब आणि ग्रामीण रूग्णालय, भिडी यांच्या संयुक्त विद्यमाने राबविलेल्या या कार्यक्रमात एच.आय.व्ही. एड्स संबंधी डॉक्टर मंडळींनी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन केले. तसेच विविध स्पर्धा घेण्यात आल्या. दिनांक ८ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे उद्घाटन कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून संत वाड.मयाचे गाढे अभ्यासक वर्धा येथील स्वावलंबी अध्यापक महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. दीपक पुनसे उपस्थित होते. दिनांक ८ सप्टेंबर हा दिवस आंतराष्ट्रीय साक्षरता दिन म्हणून साजरा करण्यात येतो, या दिवसाचे औचित्य साधून साक्षरता रॅलीचे आयोजन करण्यात आले. साक्षरतेचे महत्व सांगणा-या घोषणा देत ही रॅली देवळी व लगतच्या पाचगाव परिसरातून फिरविण्यात आली. दिनांक २४ सप्टेंबर हा दिवस राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश उपाध्याय, वर्धा येथील शिव वैभव अध्यापक महाविद्यलयाचे प्रार्चा डॉ. रवी भेंडे आणि गृहरक्षक विभागाचे वर्धा जिल्हा माजी समादेशक लेफ्टनंट प्रा.कॅ. मोहन गुजरकर उपस्थित होते. दिनांक २४ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर पर्यंत युवा-वेध सप्ताह साजरा करण्यात आला ज्यामध्ये वादविवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर आणि वाक्प्रचार स्पर्धा, गीत गायन स्पर्धा, हस्तकला स्पर्धा आणि रक्तदान व आरोग्य तपासणी शिबीर इत्यादि कार्यक्रम घेण्यात आले. २ ऑक्टोबर हा दिवस महात्मा गांधी जयंती शांती दिन म्हणून साजरा करण्यात येतो, या दिवशी महाविद्यालयात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली तसेच वर्धा येथील यशवंत महाविद्यालयाजवळील महात्मा गांधी पुतळया पासून सेवाग्राम आश्रमापर्यंत निघाणा-या शांती पदयात्रेत रा.से.यो.च्या विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने सहभाग नोंदविला. दिनांक ३ आक्टोबर ला वरोरा येथिल श्रध्देय बाबा आमटे यांच्या अनंदवन परिसरात एक दिवसीय सद्भावना शैक्षणिक सहल आणि श्रमदानाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी आनंदवन येथे होणा-या कार्याचे अवलोकन केले तसेच परिसरात श्रमदान करून परिसराला पुरक कार्य केले. दिनांक १८ ऑक्टोंबर या दिवशी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रासेयोच्या विद्यार्थ्यां सोबतच महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांनीसुध्दा सहभाग नोंदविला. दिवाळीच्या सुटया सुरू होण्यापूर्वी दिनांक ८ नोव्हेंबर ला देवळी शहरातील बस स्थानक आणि बाजार चौकामध्ये रासेयोच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहीम राबवून श्रमदान केले. दिनांक २६ नोव्हेंबरला भारतीय संविधान दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला, भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन करण्यात आले तसेच आमंत्रित अतिथींना मार्गदर्शन केले. दिनांक १ डिसेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय एडस् दिन म्हणून पाळण्यात येतो. या दिवसी एच.आ.व्ही., एडस् सबंधीत विषयावर एक प्रश्न मंजुषा आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना ग्रामीण रूग्णालय भिडी येथील समादेशक श्री. विजय ओझा आणि इतर तज्ञ मंडळींनी उत्तरे दिलीत. दिनांक ४ ते ७ डिसेंबर शेगांव-लोणार येथे शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली होती. शेगाव येथील संत गजानन महाराज देवस्थानातील सेवेकरांच्या सेवा प्रवृत्तीचे रासेयो स्वयंसेवकांनी अवलोकन केले तसेच लोणार येथील जगविख्यात सरोवराचे अध्ययन केले. दिनांक २० डिसेंबरला संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम घेण्यात आला, निमंत्रित मान्यवरांनी संत गाडगेबाबा यांच्या कार्याचा एकुण आढावा घेतला. दिनांक ३ जानेवारी सवित्रीबाई फुले यांची जयंती महिला मुक्ती दिन म्हणून साजरी करण्यात आली, सामाजिक क्षेत्रात कार्य करणा-या महिला वक्त्यांना पाचारण करून त्यांचे व्याख्यान अयोजित करण्यात आले. दिनांक १२ जानेवारी २०१६ स्वामी विवेकानंद जयंती आणि राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला. स्वामी विवेकानंद यांच्या साहित्याचे गाढे अभ्यासक वर्धा येथील श्री.अशोक लिंगायत यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. दिनांक २० जानेवारी ला महाविद्यालयाच्या रासेयो पथकाने दत्तक घेतलेलया डिगडोह या गावी गावक-यांच्या सहकार्याने ग्राम स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. दिनांक ३० जानेवारी महात्मा गांधी पुण्यतिथी तसेच हुतात्मा दिन कार्यक्रम घेण्यात आला. दिनांक ११ फेब्रुवारी ला सिकलसेल तपासणी शिबीर आयोजित करून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची सिकलसेल तपासणी करण्यात आली. या करिता आरोग्य विभागाचे श्री. विजय पचारे व त्यांच्या सहका-यांनी सहकार्य केले. दिनांक १९ फेब्रुवारीला छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त शिवाजी महाराजांच्या शौर्य

गाथा प्रोजेक्टरच्या माध्यमाने विद्यार्थ्यांना दाखविण्यात आल्या. दिनांक ८ मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून साजरा करण्यात येतो, सामाजिक क्षेत्रात महिलांसाठी कार्य कराणा-या वर्धा येथील श्रीमती हसीना गोरडे यांना निमंत्रित करण्यात आले होते.

**विशेष कार्यक्रम -**

दिनांक २० जानेवारी ला महाविद्यालयातील रा.से.यो.विभागाने दत्तक घेतलेल्या डिगडोह, ता. देवळी या गावात ग्राम स्वच्छता आणि वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. अनेक मान्यवरांसोबतच गावक-यांनी आमच्या या उपक्रमाचे कौतुक केले. देवळी या शहरात शारदीय नवरात्र मोठया उत्साहात साजरे करण्यात येते. या उत्सवा दरम्यान खाद्यपदार्थांचे वाटप लंगरच्या माध्यमाने भविकांसाठी केले जाते. हे पदार्थ प्लास्टीकच्या प्लेटस् मध्ये देण्यात येते. खाद्यपदार्थ खाऊन झाल्यावर रिकाम्या झालेल्या या प्लास्टीकच्या प्लेटस् इतरत्र फेकण्यात येतात त्यामुळे मोठया प्रमाणात कचरा होतो, ज्याकडे सर्वांचे दुर्लक्ष होते, हे ओळखून महाविद्यालयाच्या रा.से.यो. विभागाने पुढाकार घेऊन आपल्या स्वयंसेवकांच्या माध्यमाने हा प्लास्टीकचा कचरा संकलित करून तो नष्ट करण्याचाउपक्रम या कालावधीत राबविला. डिगडोह येथे दरवर्षी श्री. नागनाथ महाराजांची यात्रा भरविण्यात येते, या यात्रेमध्ये रा.से.यो.च्या माध्यमाने श्रमदानाचे कार्य केले. यावर्षी डेंग्यु या आजाराने वर्धा जिल्हयात मोठया प्रमाणात थैमान माजविले होते. या आजराबाबत ग्रामीण भागात मोठया प्रमाणात अज्ञान आढळून आले ज्यामुळे अनेक रूग्णांचा मृत्यू सुध्दा झालेला होता, ही समस्या ओळखून ग्रामीण रूग्णालय, भिडीचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. दिनेश राठोड यांच्या कडून स्वयंसेवकांना प्रशिक्षित करून घेतले. या स्वयंसेवकांचे गट तयार करून ग्रामीण भागात सायंकाळच्यावेळी जाऊन जनतेला या आजाराबाबत माहिती देण्यात आली. ज्यामध्ये हा आजार होवू नये यासाठी घेण्यात येणारी काळजी, हा आजार कसा होतो, आजार झाला तर काय उपाय करायला हवा इत्यादिबाबत आमच्या महाविद्यालयातील रा.से.यो.विभागाच्यावतीने दरवर्षी हा स्तुत्य उपक्रम राबविला जातो. त्याची दखल वैद्यकीय क्षेत्रात सुध्दा घेण्यात येते.

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करून विद्यार्थ्यांना भविष्यात वेगवेगळया स्पर्धा परीक्षांमध्ये यश कसे मिळवावे याची माहिती देण्यात आली. या शैक्षणिक वर्षाचे दरम्यान रा.से.यो.च्या वतीने प्रत्येक रविवारला प्लास्टीक निर्मूलन, गाजर गवत निर्मूलन तसेच सामाजिक विषय घेऊन मान्यवरांना आमंत्रित करून उद्बोधन व मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित केले गेले. दरवर्षी पोळा या सणाच्या निमित्ताने कत्तल करण्यात येणा-या पळस वृक्षांची जोपासना करण्यासाठी रासेयोच्या वतीने या सणाच्या आधी 'पळस वृक्ष वाचवा रॅली' काढण्यात आली.

**विशेष सहभाग -**

१) राज्य आणि केन्द्रीय स्तरावर प्रजास्ताक दिन पथसंचालनाकरिता रासेयोच्या स्वयंसेवकांमधून विविध चाचण्या दरम्यान राष्ट्रपाल शंभरकर या विद्यार्थ्यांची अंतिम निवड करण्यात आली. २६ जानेवारी २०१६ ला मुंबई येथील प्रजासत्ताक दिन पथसंचालनामध्ये रासेयो पथकात तो सहभागी होता.

२) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई परिसरात दि. २५ ते ३ जून २०१५ या कालावधीत आयोजित राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीरामध्ये (आव्हान) रासेयोच्या चार स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

३) श्रीमती राजकमल बापूराव तिडके महाविद्यालय, मौदा जि. नागपूर यांच्या माध्यमाने दि. ४ ते १० जानेवारी २०१६ या कालावधीत नरसाळा ता. मौदा येथे आयोजित 'स्वच्छ भारत अभियानाकरिता युवाशक्ती' या संकल्पनेवर आयोजित विद्यापीठ स्तरीय शिबीरामध्ये महाविद्यालयातील चार स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

४) महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई यांच्या आदेशानुसार शाळाबाहय मुलांचे सर्वेक्षण करण्यासाठी रासेयोच्या स्वयंसेवकांनी सहकार्य केले.

५) दरवर्षी महाविद्यालयातील रासेयो पथकातील रेड रिबन क्लब मध्ये सहभागी स्वयंसेवक वर्षभर देवळी-वर्धा परिसरात गरजूंना रक्तदान करतात. वर्धेतील सेवाग्राम आणि सावंगी येथील दवाखान्याच्यावतीने किंवा रूग्णांच्या नातेवाईकांच्या विनंती नुसार रासेयो स्वयंसेवकांना रक्तदानासाठी पाठविण्यात येते. या कार्याकरिता मोठया उत्साहाने विद्यार्थी तत्पर असतात.

६) दरवर्षी २ ऑक्टोबरला महात्मा गांधी जयंती निमित्त वर्धा येथील महात्मा गांधी पुतळा ते सेवाग्राम आश्रम पर्यंत गांधी विचार परिषदेच्या माध्यमाने काढण्यात येणा-या शांती पद यात्रेमध्ये रासेयोचे स्वयंसेवक मोठया संख्येने सहभागी होतात.

**विशेष उल्लेखनीय -**

मागील तीन वर्षात (शेक्षणिक सत्र २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५) महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या मार्फत केलेल्या उत्कृष्ट कामाची दखल घेऊन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने सन २०१४-१५ चा उत्कृष्ट रासेयो कार्यक्रम अधिकारी म्हणून प्रा. डॉ. गोपाल हेलोंडे यांना तर उत्कृष्ट रासेयो एकक म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश उपाध्याय यांना मेळघाट येथील सुप्रसिध्द समाजसेविका डॉ.स्मिता कोल्हे, कुलगुरू डॉ. सिध्दार्थविनायक काणे, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद येवले, कुलसचिव श्री. पुरण मेश्राम आणि रासेयो कार्यक्रम समन्वयक डॉ.भाऊ दायदार यांच्या हस्ते विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहामध्ये आयोजित भव्य कार्यक्रमात पुरस्कार व मानपत्र देऊन सम्मानित करण्यात आले.

**विशेष निवासी श्रमसंस्कार शिबीर -**

देवळी तालुक्यातील भिडी या गावातील सरपंच, स्वयंसेविका आणि गावक-यांच्या विनंतीनुसार दिनांक २३ ते ३० डिसेंबर २०१५ या कालावधीत महाविद्यालयाच्या रा.से.यो.विभागाने विशेष निवासी श्रमसंस्कार शिबीर आयोजित केले होते.

'स्वच्छतेसाठी युवक' या संकल्पनेवर आधारित या शिबीरामध्ये विविध ग्रामोपयोगी कार्य करण्यात आले. ज्यामध्ये गावातील नाल्यांची स्वच्छता, गावातील शौचालयांची माहिती संकलित करणे, हागणदरी मुक्त गांव करण्यासाठी गावक-यांना

प्रबोधन करून घरी शौचालय बांधण्याबाबत प्ररित करणे, ग्राम स्वच्छतेचे महत्व गावक-यांना पटवून सांगणे, अंधश्रध्दा निर्मूलनार्थ विविध कार्यक्रम राबविणे, ज्यामध्ये गावक-यांचे प्रबोधन मान्यवर प्रबोधनकारांचे मनोरंजनात्मक कार्यक्रम घेऊन करणे, स्त्रीभ्रुण हत्येसंबंधी प्रबोधन, गावांत कचरा कुंडयांचे व्यवस्थापन करणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था कशी असावी याबाबत गावंक-यांना माहिती देणे, वृक्षारोपण व संवर्धनार्थ योगदान तसेच जिल्हा परिषद वर्धा यांनी पुरविलेल्या वेगवेगळया साहित्याच्या मार्फत गावक-यांना स्वच्छते विषयीची माहिती देण्यात आली.

गवक-यांच्या आरोग्यविषयी कार्यक्रम घेण्यात आला, ग्रामीण रूग्णालय भिडी यांच्या सहकार्याने सिकलसेल तपासणी, रक्तगट तपासणी, नेत्र रोग तपासणी, रक्तदाब, हृदय रोग निदान, एच.आय.व्ही. एडस् संबंधीची तपासणी इत्यादि आरोग्यविषयक तपासणी करण्यात आल्या. तसेच रक्तदान शिबीर घेण्यात आले ज्यामध्ये एकूण २६ रक्तदात्यांनी रक्तदान केले. महिला मेळावा घेण्यात आला, या मेळाव्यामध्ये स्त्रियांना त्यांच्या आजाराबाबत मार्गदर्शन करण्यासाठी कस्तुरबा हेल्थ सोसायटी मधील महिला डॉक्टरांच्या चमूला आमंत्रित करण्यात आले होते, त्यांनी या महिला मेळाव्यात आलेल्या महिलांना मार्गदर्शन केले. तसेच महिला सशक्तीकरणाअंतर्गत बचत गटाच्या माध्यमाने कशा प्रकारे उद्योग करून आपले आर्थिक उत्पन्न वाढवू शकतो याविषयी मार्गदर्शन करण्यात आले, त्यासाठी बँका कर्ज पुरवठा कशा प्रकारे करतात याची माहिती देण्यासाठी बँकामधील अधिकारी वर्गांना आमंत्रित केले होते. विशेष निवासी श्रमसंस्कार शिबीरामध्ये या व्यतिरिक्त सुध्दा लोकोपयोगी आणि मार्गदर्शक कार्यक्रम राबविण्यात आले. भिडी या गावालगत असलेल्या आदिवासी तांडा वस्तीवर जावून शिबीरार्थी विद्यार्थ्यांनी त्यांना स्वच्छते विषयी माहिती दिली, तसेच शिक्षणाचे महत्व पटवून सांगून आपल्या पाल्यांना शाळेत पाठविण्याबाबत प्रेरित करण्याचा प्रयत्न केला, या उपक्रमा दरम्यान आदिवासी जीवनशैलीचा शिबीरार्थीनी अभ्यास केला.

या शिबीराच्या माध्यमाने भिडी या गावात या कालावधीत जे विविध कार्यक्रम घेण्यात आले तसेच कार्य करण्यात आले याची दखल गावक-यांनी घेतली. शिबीराकरिता त्यांनी खूप चांगले सहकार्य केले. तसेच या गांवातील सरपंच, ग्रामसेवक, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, गावातील प्रतिष्ठित नागरिक व समाजसेवक यांनी महाविद्यालयाच्या या उपक्रमाची खुप प्रशंसा करून, या शिबीरामुळे आमच्या गावातील रहिवाश्यांच्या मानसिकतेत नक्कीच बदल होईल आणि आम्हाला सुध्दा गाव विकासाचे काम करणे आता सहज शक्य होईल असा विश्वास दर्शविला.

प्रा.डॉ. गोपाल वि. हेलोंडे

कार्यक्रम अधिकारी

राष्ट्रीय सेवा योजना




रासेयो द्वारे आयोजित आनंदवन, वरोरा येथिल विशेष सद्भावना अभ्यास रॅलीला संबोधित करतांना तेथिल कार्यक्रम अधिकारी आणि प्राचार्य



रासेयो द्वारे आयोजित आनंदवन, वरोरा येथिल विशेष सद्भावना अभ्यास दौऱ्यादरम्यान श्रमदान करतांना स्वयंसेवक



रासेयो द्वारे आयोजित आनंदवन, वरोरा येथिल विशेष सद्भावना अभ्यास दौऱ्यादरम्यान श्रमदान करतांना स्वयंसेवक



रासेयो द्वारे आयोजित आनंदवन, वरोरा येथिल विशेष सद्भावना अभ्यास दौऱ्यादरम्यान श्रमदान करतांना स्वयंसेवक




रासेयो द्वारा महाविद्यालयात आयोजित सिकलसेल तपासणी शिबीर




रासेयो द्वारा महाविद्यालयात आयोजित सिकलसेल तपासणी शिबीर



स्व.दाआजी उपाख्य बापूरावजी देशमुख स्मृतीदिन– रासेयोद्वारा आयोजित वृक्षारोपण कार्यक्रम



स्व.दाआजी उपाख्य बापूरावजी देशमुख स्मृतीदिन– रासेयोद्वारा आयोजित वृक्षारोपण कार्यक्रम



विशेष श्रम–संस्कार शिबीर, भिडी– उद्घाटन कार्यक्रम



विशेष श्रम–संस्कार शिबीर, भिडी– उद्घाटन कार्यक्रम


विशेष श्रम–संस्कार शिबीर, भिडी– मशाल रॅली– मशाल प्रज्वलन


विशेष श्रम–संस्कार शिबीर, भिडी– मशाल रॅली



पोस्टर स्पर्धा (युवा–वेध सप्ताह कार्यक्रम)




पोस्टर स्पर्धा (युवा–वेध सप्ताह कार्यक्रम)



पोस्टर स्पर्धा (युवा–वेध सप्ताह कार्यक्रम)


हस्तकला स्पर्धा (युवा–वेध सप्ताह कार्यक्रम)



विशेष श्रम संस्कार शिबीर, भिडी– ग्राम स्वच्छता




विशेष श्रम संस्कार शिबीर, भिडी– राम धुन रॅली




विशेष श्रम संस्कार शिबीर, भिडी– मनोरंजनातून समाजप्रबोधन




रासेयो द्वारा महाविद्यालयात आयोजित सिकलसेल तपासणी शिबीर



विशेष श्रम–संस्कार शिबीर, भिडी– आदिवासी वस्ती ग्राम स्वच्छता



विशेष श्रम–संस्कार शिबीर, भिडी– आदिवासी लोकसंगीत प्रदर्शन



विशेष श्रम–संस्कार शिबीर, भिडी– आदिवासी बांधवांना स्वच्छते संबंधी मार्गदर्शन



विशेष श्रम–संस्कार शिबीर, भिडी– आदिवासी लोकसंगीत प्रदर्शन

देशोन्नती 29/8/2019

# एचआयव्ही.एड्स जनजागृतीपर कार्यक्रम

## एस.एस.एन.जे. कॉलेज आणि ग्रामीण रुग्णालय भिडी यांचा संयुक्त उपक्रम

*प्रतिनिधी / २० ऑगस्ट*

**वर्धा :** देवळी येथील एस.एस.एन.जे. महाविद्यालयामधील राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत रेड रिबन क्लब आणि ग्रामीण रुग्णालय, भिडी यांनी संयुक्तरित्या आंतरराष्ट्रीय युवा करून समाजात तशी जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने महाविद्यालयात या विषयावर पोस्टर स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आणि घोषणा वाक्य स्पर्धा आयोजीत करण्यात आली होती.

स्पर्धेमध्ये यशस्वी आणि सहभागी विद्यार्थ्यांना पारितोषिके व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाध्यक्ष मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ. गणेश मालधुरे उपस्थित होते तर अतिथि जिल्हा कार्यक्रम अधिकारी शिवा देवगडे तर मार्गदर्शक म्हणून डॉ.उज्वला कांबळे, डॉ.सीमा खान,रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.गोपाल हेलोंडे, समुपदेशक विजय ओझा, प्रयोगशाळा तज्ञ माधुरी मोयर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीस एडस् संबंधी सामुहीक शपथ घेण्यात आली. अध्यक्षीय भाषणात डॉ.मालधुरे यांनी संत महात्म्यांच्या विचारांची मांडणी करून समाजास सत्शिल तसेच नैनिकतेची शिकवण त्यांनी या काळात कशी दिली हे सांगितले. प्रमुख पाहुणे शिवा देवगडे यांनी एच.आय.व्ही. होण्याच्या कारणांना स्पष्ट केले तसेच त्यांची लक्षणे कशी ओळखली जातात यांची माहिती दिली. युवक-युवतींनी संयमी असायला हवे असे आवाहन केले. डॉ.उज्वला कांबळे आणि डॉ.सिमा खाने यांनी विद्यार्थ्यांमध्ये एच.आय.व्ही.ची लागण वाढत्या व्यसनाधिनतेमुळे होते,तसेच याकरीता पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करण्याची युवकांची सवय कशी करणीभूत आहे, हे उदाहरणासह स्पष्ट केले. तर रोखण्यासाठी जनजागृती आणि कारणीभूत आहे, हे उदाहरणासह स्पष्ट केले. ते रोखण्यासाठी जनजागृती आणि योग्य आरोग्यविषयक माहिती आत्मसात करण्याचे आवाहन त्यांनी केले या कार्यक्रमाच्या निमित्ताने आयोजित पोस्टर, चित्रकला आणि घोषणा वाक्य स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके व प्रमाणपत्र देण्यात आले. ज्यांमध्ये प्रथम पुरस्कार प्रांजली इंगळे,रश्मी सायकार तर प्रोत्साहनपर पुरस्कार काजल देशमुख, पल्लवी बिजवार, श्रद्धा ठाकरे,प्रीती तिरकुंट, लिनता खंडाळकर, त्रिशुल मोयर यांना देण्यात आले. प्रास्ताविक विजय ओझा यांनी केले. संचालन योगेश येनकर यांनी तर आभार श्रद्धा ठाकरे हिने मानले.

दै. देशोन्नती

२ | वर्धा
गुरूवार, १७ सप्टेंबर २०१५

जि

# एस.एस.एन.जे.महाविद्यालयाचा उपक्रम

# राष्ट्रीय सेवा योजना पथक उद्‌घाटन कार्यक्रम




शहर प्रतिनिधी/ १६ सप्टेंबर
देवळी : स्थानिक देवळी येथील एस.एस.एन.जे.महाविद्यालयातील शैक्षणिक सत्र २०१५-१६ मधील राष्ट्रीस सेवा योजना पथकाचा उद्‌घाटन सोहळा नुकताच पार पडला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे आणि उद्‌घाटक म्हणून स्वावलंबी अध्यापक महाविद्यालयातील जेष्ठ प्राध्यापक तसेच संत वाडमयाचे गाढे अभ्यासक डॉ.दिपक पुनसे हे होते. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.गणेश मालधुरे उपस्थिती होते.मंचावर रा.से.यो.चे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापिका माधुरी देशमुख तसेच प्रा.संतोष मोहदरे, प्रा.प्रविण पाटील, समाज प्रबोधनकार प्रशांत कुमरे उपस्थित होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि वैराग्य मूर्ती गाडगे बाबा यांच्या प्रतिमांना हारार्पण आणि दिप प्रज्वलन झाल्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आणि उद्‌घाटक प्रा.डॉ.पुनसे यांनी संतांची समाजसेवा या विषयावर उपस्थितांन मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपली खंजीरी आणि वैराग्यमूर्ती गाडगेबाबा यांनी खराटा या साहित्याचा वापर करुन समाजास शिकविण्याचे कार्य केले.आपल्या महाराष्ट्राला संतांची मोठी परंपरा लाभलेली आहे, जे संत वर्ग सुध्दा शिकले नाही नाही त्यांची नावे आज वेगवेगळया विद्यापीठांना दिली जात आहे, ही विचार करण्यासाठी बाब आहे.

अत्यंत विपरीत परिस्थिती मध्ये समाजातील अनिष्ठ मांध्यमाने या संतोचेच कार्य पुढे नेण्याचा प्रयत्न महाविद्यालयातील युवक-युवतींच्या माध्यमाने केले जात असल्याचे प्रतिपादन त्यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले. कार्यक्रमाध्यक्ष प्रा.डॉ.मालधुरे यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या कार्याचा आढावा घेवून आज लग्नप्रसंगी जो अमाप खर्च केला जात आहे तो कमी करण्यासाठी राष्ट्रसंतांच्या विचाराचा अंगीकार केला पाहिजे. एकीकडे मुलीवर मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागत असल्याने ती गर्भात असतानाच तिची हत्या केली जाते. हा खर्च आपण कमी करु शकतो जर राष्ट्रसंतांचे विचार आचरणात आले तर या संदर्भात त्यांनी अनेक उदहरणे देवून मुद्दा समजावून सांगितला आणि रासेयोच्या स्वयंसेवकांनी आवाहन केले की, संतांचे विचार सर्व सामान्यांपर्यंत पोहचविण्याचे कार्य करावे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.गापोल हेलोंडे यांनी वर्षभर राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमाची रुपरेषा स्पष्ट केली. कार्यक्रमाचे संचालन स्वयंसेवक प्रतिक मेघे यांनी तर आभार लिनता खंडाळकर हीने मानले. कार्यक्रमास स्वयंसेवक-स्वयंसेविका तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

लोकमत सोमवार, दि. २१ सप्टेंबर २०१५ 

## थोडक्यात जिल्हा

# एस.एस.एन.जे. महाविद्यालय

**देवळी :** स्थानिक एस.एस.एन.जे. महाविद्यालयात चालु शैक्षणिक सत्रात राष्ट्रीय सेवा योजना पथकाची स्थापना करण्यात आली. या कार्यक्रमाला उद्‌घाटक म्हणून स्वावलंबी अध्यापक महाविद्यालय, वर्धा येथी प्रा. दीपक पुनसे, अध्यक्ष म्हणून मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. गणेश मालधुरे उपस्थित होते. मंचावर रा.से.यो.चे. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. गोपाल हेलोंडे, सहकार्यक्रम अधिकारी प्रा. माधुरी देशमुख, प्रा. संतोष मोहदरे, प्रा. प्रविण पाटील, समाज प्रबोधनकार प्रशांत कुमरे उपस्थित होते. यावेळी पुनसे यांनी स्वयंसेवकांना संत विचारावर मार्गदर्शन केले. प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. गोपाल हेलोंडे यांनी केले. तसेच वर्षभर राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमाची रुपरेषा स्पष्ट केली. कार्यक्रमाचे संचालन स्वयंसेवक प्रतिक मेघे याने तर आभार लिनता खंडाळकर हीने मानले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने स्वयंसेवक-स्वयंसेविका, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

यशस्वितेकरिता शारीरिक शिक्षक साखे, राठोड, झामले तसेच शिक्षकवृंदानी परिश्रम घेतले.

देशोन्नती

२ आक्टो. २०१५

# युवा वेध सप्ताहाचे उद्घाटन

तालुका प्रतिनिधी/३० सप्टेंबर

**देवळी :** स्थानिक एस. एस. एन. जे. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना स्थापनादिन आणि युवा वेध सप्ताहाचा उद्घाटन कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुरेश उपाध्याय होते. प्रमुख पाहुणे आणि उद्घाटक म्हणून प्रा. लेप्ट. मोहन गुजरकर उपस्थित होते, मंचावर रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. गोपाल हेलोंडे, मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. गणेश मालधुरे, लोकशाहिर प्रशांत कुमरे, प्रा. प्रविण पाटील उपस्थित होते. सर्वप्रथम अतिथींच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पुजन आणि दिपप्रज्वलन करण्यात आले. रासेयोच्या स्वयंसेवक स्वयंसेविकांनी रासेयो प्रार्थना आणि गीत म्हणून कार्यक्रमास सुरुवात केली. प्रमुख पाहुणे प्रा. गुजरकर मार्गदर्शन करतांना म्हणाले, पंडित जवाहरलाल नेहरु आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचारधारेतून महाविद्यालयीन युवक युवतींसाठी राष्ट्रीय सेवा योजना हा विभाग सुरु झाला.

समाजसेवेचे व्रत जोपासणाऱ्या युवक युवतींची आज देशाला गरज आहे, रासेयोच्या माध्यमाने उत्तम समाज सेवक घडविण्याचे कार्य केल्या जात असल्याचे दिसून येते, अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. उपाध्याय म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमाने अनेक उपक्रम राबवून लोकोपयोगी कार्य केले जात आहे, ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांमध्ये या उपक्रमांमुळे जागृती होत असल्याचा अनुभव आहे. देशाची सेवा ही समाजसेवा केल्यामुळे सुध्दा केली जाऊ शकते. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. गोपाल हेलोंडे यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये सांगितले की, रासेयोच्या स्थापना दिनापसून महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत एक आठवडा युवा वेध सप्ताह महाविद्यालयात राबविण्यात येत आहे. ज्यामध्ये युवा मनाचा वेध घेण्याचे कार्य करण्यात येईल, नियोजित विविध कार्यक्रमांमध्ये आपला शेतकरी समृध्द कसा होईल, या विषयावर परिसंवाद, आजच्या टी.व्ही. धारावाहिका समाजपरिवर्तनास उपयोगी आहे अथवा नाही या विषयावर वाद-विवाद स्पर्धा, भावगीत स्पर्धा, स्वच्छ भारत अभियान या विषयाला अनुसरुन पोस्टर आणि वाक्यप्रचार स्पर्धा, हस्तकला स्पर्धा तसेच रक्तदान आणि आरोगय शिबिर असे विविधांगी कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत. कार्यक्रमाचे संचालन स्वयंसेविका रोशनी पाटणकर हीने तर आभार योगिता बैस हीने मानले.

ात मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष शंकर पोटफोडे, मनविसे
ढेकर, शहर अध्यक्ष श्याम परसोडकर, नंदू सहेरे,
धाकतोडे, दीपक गेडाम, राहुल देवळीकर, अजय
शुभम जळगावकर, शंकर पापल, नरेश राऊत, दीपक
, सूरज कावडे, पुरुषोत्तम राऊत, प्रतीश जवादे,
णे, सुहास ढाले, अपेक्षित रामटेके, शुभम सेलूकर,
थूल, अक्षय गावंडे, राजू पोकळे, अरविंद जगणकर
धिकारी आणि कार्यकर्त्यांचा सहभाग होता.


वर्धा, गुरुवार, १ ऑक्टोबर २०१५

सकाळ वर्धा


मुळे वर्धा-नागपूर महामार्गावर ठप्प झालेली

## तीन जखमी

श्यामराव ठाकरे (वय ५४) रा. दहेगाव, ता. चांदूर
ती, मोनाली उमेश ठाकरे (वय ३५) रा. नागपूर आणि
कर (वय ३४) रा. चांदूर (रेल्वे) यांचा समावेश आहे.
ंद्र्यांची चिमुकलीही होती. तिला कोणतीही इजा झाली
एच ३९४४ क्रमांकाच्या कारने कारंजामार्गे नागपूरला
ग्यात घडला. सावळी (खुर्द) फाट्याजवळ वळणरस्ता
ओवताना चालकाचे नियंत्रण सटले आणि कार थेट रस्ता

# रासेयो स्थापनादिन, युवा वेध सप्ताह

## देवळी येथील एसएसएनजे महाविद्यालयातील उपक्रम

सकाळ वृत्तसेवा

वर्धा, ता. ३० : देवळी येथील एसएसएनजे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना स्थापनादिन आणि युवा वेध सप्ताहाचा उद्घाटन कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुरेश उपाध्याय होते. उद्घाटन लेफ्ट. प्रा. मोहन गुजरकर यांच्या हस्ते झाले. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. गोपाल हेलोंडे, मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. गणेश मालधुरे, लोकशाहीर प्रशांत कुमरे, प्रा. प्रवीण पाटील प्रामुख्याने उपस्थित होते.

प्रा. गुजरकर म्हणाले, पं. जवाहरलाल नेहरू आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचारधारेतून महाविद्यालयीन युवक-युवतींकरिता राष्ट्रीय सेवा योजना हा विभाग सुरू झाला. रासेयोच्या माध्यमातून उत्तम सेवक घडविण्याचे कार्य केले जात असल्याचे दिसून येते. प्राचार्य उपाध्याय म्हणाले, रासेयोच्या माध्यमातून अनेक उपक्रम राबवून लोकोपयोगी कार्य केले जात आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांमध्ये या उपक्रमांमुळे जागृती होत असल्याचा अनुभव आहे. देशाची सेवा ही समाजसेवा केल्यामुळेसुद्धा केली जाऊ शकते. प्रास्ताविकातून डॉ. हेलोंडे यांनी रासेयोच्या स्थापनादिनापासून महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत एक आठवडा युवा वेध सप्ताह महाविद्यालयात राबविण्यात येत असल्याचे सांगतानाच या माध्यमातून युवामनाचा वेध घेण्याचे कार्य करण्यात येईल, नियोजित विविध कार्यक्रमांत आपला शेतकरी समृद्ध कसा होईल, या विषयावर परिसंवाद, वाहिन्यांवरील आजच्या मालिका समाजपरिवर्तनास उपयोगी आहे अथवा नाही, या विषयावर वादविवाद स्पर्धा, स्वच्छ भारत अभियान या विषयाला अनुसरून पोस्टर आणि वाक्प्रचार स्पर्धा, हस्तकला स्पर्धा तसेच रक्तदान आणि आरोग्य शिबिर असे विविध कार्यक्रम आयोजित असल्याची माहिती दिली.

संचालन स्वयंसेविका रोशनी पाटणकर हिने केले, तर आभार योगिता बैस हिने मानले. कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि रासेयोचे स्वयंसेवक इतर विद्यार्थी उपस्थित होते.




वर्धा : विचार व्यक्त करताना प्राचार्य उपाध्याय; उपस्थित मान्यवर.

देशोन्नती

३० नोव्हेंबर २०१५

# डेंग्यू आजाराबाबत जनजागृती कार्यक्रम

## एस.एस.एन.जे. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचा उपक्रम

*तालुका प्रतिनिधी/ २९ नोव्हेंबर*

**देवळी :** देवळी तहसील परिसरातील अनेक गावांमध्ये सध्या डेंग्यू या आजाराने थैमान घातलेले आहे. या आजारावर हमखास असा इलाज अनेक रुग्णालयांमध्ये उपलब्ध नाहीत त्यामुळे या आजाराची लागण झालेल्या अनेक पीडितांना आपले प्राण गमवावे लागलेले आहे. समाजसेवेचे व्रत घेवून काम करणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या मार्फत या संदर्भात काही करता येते काय, याचा विचार करुन स्थानिक एस.एस.एन.जे. महाविद्यालयातील रा.से.यो. विभागाने ग्रामीण भागात जावून यासंदर्भात ग्रामस्थांना मार्गदर्शन करणे सुरु केलेले आहे.

कार्यक्रम अधिकारी प्रा.गोपाल हेलोंडे यांच्या मार्गदर्शनात रासेयोच्या स्वयंसेवकांचे वेगवेगळे गट तयार करुन हे गट देवळी परिसरातील नांदोरा, अंजी- अंदोरी, भिडी, बोपापूर, दिघी, डिगडोह, चिकनी, जामणी इत्यादी गावात सायंकाळच्या वेळी ग्रामस्थांना एकत्रित करुन डेंग्यू या आजारबाबत जनजागृती करुन तो होणार नाही यासाठी घ्यावी लागणारी दक्षता याविषयी त्यांना माहिती देण्याचे कार्य करीत आहेत, यामहितीमध्ये डेंग्यू हा आजार विशेष प्रकारच्या डासांपासून कसा पसरतो, स्वच्छ पाण्यात या डासाची मादी अंडी देते ज्यामुळे त्यांची पैदास मोठ्या संख्येने वाढते, तसेच हे डास विशेषता दिवसा चावतात, चावणारे डास हे मादी प्रकारातील असतात ज्यामुळे डेंग्यू आजाराची लागण होते, बाधीत व्यक्तीच्या रक्तातील पांढऱ्या पेशी वेगाने कमी होतात, योग्य उपचार मिळाला नाही तर रुग्णाचा मृत्यू सुद्धा होतो. यावर एकच उपाय म्हणजे योग्य प्रकारची काळजी घेणे. पाणी जास्त दिवस साठवून ठेवू नये, आजूबाजूला साचलेले पाणी प्रवाहीत करावे, पिण्याच्या पाण्याचे भांडे तसेच पाणी साठवणूक केलेले टाके आठवड्यातून एक दिवस कोरडे करुन उन्हात सुकवावे, ताप आला किंवा अस्वस्थता वाढलीतर ताबडतोब रुग्णालयात गेले पाहिजे इत्यादि प्रकाराची माहिती गावकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी कामगिरी रासेयोचे स्वयंसेवक उत्साहात करीत आहेत, ज्याचा चांगला परिणाम या भागात दिसून येत आहे. विद्यार्थ्यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

या कार्यक्रमामध्ये त्यांना मदत करण्याचे कार्य प्रा.प्रविण पाटील, प्रा.प्रशांत कुमरे, आशिष गांवडे, विपूल ताडाम, संदीप पाटील, स्वप्नील राऊत करीत आहेत.

रासेयो स्वयंसेवकांचा पुढाकार : मशाल रॅलीतून केला सामाजिक विषमतेवर प्रहार

# 'स्वच्छतेसाठी युवक' संकल्पनेतून भिडी गाव झाले स्वच्छ

**देवळी :** येथील एस.एस.एन.जे. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाने 'स्वच्छतेसाठी युवक' या संकल्पनेतून भिडी गाव स्वच्छ करीत समाजात कृतीशीलतेचा संदेश दिला. यात ग्रामस्थांनी सहभाग घेत स्वच्छता अभियानाला हातभार लावला. ग्रामस्थांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्याकरिता युवकांनी स्वत: गावातील नाल्यांची व रस्त्याची सफाई करून अनोखी जागृती केली आहे.



गावातून मिरवणूक काढून स्वच्छतेचा संदेश देण्यात आला. दुसऱ्या छायाचित्रात गावातील नाल्यांची स्वच्छता करताना युवक.

तालुक्यातील भिडी या गावात रासेयो पथकाचे सात दिवसीय श्रमसंस्कार शिबिर आयोजित करण्यात आले आहे. शिबिरातून केवळ जनजागृती न करता त्याला कृतीची जोड दिल्याने ग्रामस्थांनी युवकांना सहकार्य करीत अभियानात सक्रीय सहभाग दर्शविला.

शिबिराचे उद्घाटन जिल्हा परिषद सदस्य उज्ज्वला राऊत यांनी केले. अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश उपाध्याय होते. प्रमुख पाहुणे म्हणून रासेयो विभागीय समन्वयक प्रा.डॉ. राजीव जाधव, पंचायत समिती सदस्य श्रीधर लाभे, उपसरपंच नितीन दिघाडे उपस्थित होते.

जिल्हा परिषद विभागाच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत ग्रामीण भागात सुरु असलेल्या या उपक्रमाला सहकार्य करण्याच्या अनुषंगाने 'स्वच्छतेसाठी युवक' ही संकल्पना राबविण्यात आली. जिल्हा परिषद येथील माहिती, शिक्षण व संवाद तज्ज्ञ, स्वच्छ भारत अभियानचे विनोद खोब्रागडे यांच्या मार्गदर्शनात या शिबिरात विविध उपक्रम राबविण्यात आले. यावेळी गावातून मशाल रॅली काढण्यात आली. यात स्वयंसेवकांनी घोषणा देत गावकऱ्यांना स्वच्छता आणि आरोग्याविषयी जागृत केले.

दैनंदिन उपक्रमांतर्गत गावातील नाल्यांची व रस्त्यांची स्वच्छता केली. प्लास्टिक निर्मूलनाचा संदेश देण्यात आला. पिण्याचे पाणी आणि पाण्याचा योग्य वापर याबाबत गावकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. विशेष उपक्रमांतर्गत लगतच्या हेटी येथील वस्तीवर व्यसनाधिनतेपासून दूर राहण्याविषयी जागृती केली.

बौध्दिक सत्रांतर्गत अंनिसचे राज्य सल्लागार संजय इंगळे तिगावकर यांनी संतांचा वैज्ञानिक दृष्टीकोन विषयावर मार्गदर्शन केले. माजी जिल्हा समादेशक लेप्ट. प्रा. मोहन गुजरकर यांनी ग्रामस्वच्छतेची आवश्यकता यावर प्रबोधन केले. प्रा. मोहन सोनूरकर यांनी सुदृढ आरोग्यासाठी स्वच्छतेचे महत्व समजावून सांगितले. अजय यानखडे यांनी राष्ट्र निर्मितीत युवकांचे योगदान या विषयावर मार्गदर्शन केले. निसर्ग मित्र ग्रामीण विकास शिक्षण संस्था वर्धाचे अध्यक्ष अजय तिगावकर यांनी व्यवसाय शिक्षण ही काळाची गरज आहे, असे सांगितले. समाज प्रबोधनकार जीवन चौरे यांनी राष्ट्रसंतांची युवकांना शिकवण या विषयावर प्रबोधन केले. प्रा. रणजीत कांबळे यांनी आजच्या युवकांपुढील आव्हाने या विषयावर माहिती दिली.

येथील लोकशाहीर गजानन भोरे आणि संचाने मनोरंजनातून समाज प्रबोधन करताना राष्ट्रसंतांचा संदेश मनोरंजनातून दिला. प्रबोधनकार प्रशांत कुमरे व संचाने वऱ्हाडी थाटात कार्यक्रम सादर करून उपस्थितांची दाद मिळविली.

ग्रामीण रुग्णालय भिडी यांच्या सहकार्याने आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर घेण्यात आले. विविध आजारांची तपासणी गावकऱ्यांना आरोग्याविषयी माहिती देण्यात आली. रक्तदान शिबिरात शिबिरार्थी व नागरिकांनी सहभाग नोंदविला. वैद्यकीय अधीक्षक डॉ. निदेश राठोड, डॉ. सुरेश खोडवे, डॉ. चकोर, रोकडे, समुपदेशक विजय ओझा आदींनी मार्गदर्शन केले. यानंतर महिला मेळावा घेण्यात आला. यात स्त्री-भ्रूणहत्या, हागणदारीमुक्त गाव, अंधश्रद्धा, वृक्षाचे महत्त्व, शिक्षणाचे महत्त्व, शेतकरी आत्महत्या यावर पथनाट्य सादर केले. कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. गोपाल हेलोंडे यांनी शिबिरार्थींना मार्गदर्शन केले. समारोपीय कार्यक्रमाला ग्रामस्थ

मार्गदर्शन...

## रासेयो स्वयंसेवकांचा पुढाकार ; मशाल रॅलीतून केला सामाजिक विषमतेवर प्रहार

# स्वच्छतेसाठी युवक संकल्पनेतून भिडी गाव झाले स्वच्छ

ाहर प्रतिनिधी / ८ जानेवारी
ावळी : स्थानिक एस.एस.एन.जे.
हाविद्यालय राष्ट्रीस सेवा योजना
िभागाच्या माध्यमाने भिडी येथे
वच्छतेसाठी युवक या संकल्पनेवर
ाधारीत सात दिवसीय वार्षिक निवासी
म संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात
ाले होते. या शिबिराला उद्घाटक म्हणून
ाडी विभागाच्या जिल्हा परिषद सदस्य
ाला राऊत उपस्थित होत्या.
्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य
. सुरेश उपाध्याय उपस्थित होते. प्रमुख
ुणे म्हणून रासेयो विभागीय समन्वयक
डॉ. राजीव जाधव, भिडी विभागाचे
ायत समिती सदस्य श्रीधर
े, उपसरपंच नितीन दिघाडे उपस्थित
.

जिल्हा परिषद, वर्धाच्या माध्यमाने
ण्यात येत असलेल्या स्वच्छ भारत अभियान
ि ग्रामीण भागात सुरु असलेल्या उपक्रमाला
र्थ लाभावे, या अनुषंगाने या शिबिराची
पना स्वच्छतेसाठी युवक ही ठेवण्यात आली होती. जिल्हा परिषद येथील माहिती, शिक्षण व संवाद तज्ज्ञ स्वच्छ भारत अभियानचे विनोद खोब्रागडे यांच्या मार्गदर्शनात या शिबिरामध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले. शिबिराच्या पहिल्या दिवशी मशाल रॅलीच्या माध्यमाने विविध घोषणा देत भिडी या गावातील गावकऱ्यांना स्वच्छता आणि आरोग्यविषयी जागृत करण्यात आले. दैनंदिन उपक्रमांअंतर्गत गावातील नाल्यांची व रस्त्यांची स्वच्छता तसेच प्लास्टिक निर्मूलन करुन संदेश देण्यात आला. पिण्याचे पाणी आणि पाण्याचा योग्य वापर याविषयी गावकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. विशेष उपक्रमांअंतर्गत भिडीलगत असलेल्या हेटी या कोलाम बांधवांच्या वस्तीवर तेथील अस्वच्छता आणि व्यासनाधिनतेपासून तेथील नागरीकांना परावृत्त करुन त्यांची तशी मानसिकता व्हावी, यासाठी विशेष कार्यक्रम राबविण्यात आला.

शिबिरातील बौद्धीक सत्राअंतर्गत मान्यवर तज्ज्ञांना आमंत्रित केले होते. त्यांनी विविध विषयावर शिबिरार्थी आणि गावकऱ्यांचे प्रबोधन केले. ज्यामध्ये प्रामुख्याने राज्य सल्लागार, आंतर भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे प्रा.संजय इंगळे तिगावकर यांनी संतांचा वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर तर माजी






जिल्हा समादेशक, गृह रक्षक दलाचे प्रा. मोहन गुजरकर यांनी ग्राम स्वच्छतेची आवश्यकता या विषयावर, लोक महाविद्यालय येथील रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.मोहन सोनुकर यांनी सुदृढ आरोग्यासाठी स्वच्छतेचे महत्त्व तर यशवंत विद्यालय भिडी येथील अजय वानखडे यांनी राष्ट्र निर्मितीत युवकांचे योगदान या विषयावर प्रबोधन केले. निसर्ग मित्र ग्रामीण विकास शिक्षण संस्था अध्यक्ष अजय तिगावरक यांनी व्यवसाय शिक्षण काळाची गरज, समाज प्रबोधनकार जिवन चोरे यांनी राष्ट्रसंतांची युवकांना शिकवण या विषयावर तर प्रा.रणजित कांबळे यांनी आजच्या युवकांपुढील आव्हाने याविषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते. तसेच प्रबोधनकार प्रशांत कुमरे व त्यांच्या संचानी सुद्धा वऱ्हाडी थाटात कार्यक्रम सादर करुन उपस्थितांची दाद मिळविली. याच शिबीरात ग्रामीण रुग्णालय भिडी यांच्या सहकार्याने आरोग्य तपासणी आणि रक्तदान शिबिर घेण्यात आले. विविध आजारांची तपासणी करुन शिबिरार्थी आणि गावकऱ्यांना आरोग्यविषयी माहिती देण्यात आली, रक्तदान करुन शिबीरार्थी विद्यार्थी आणि शिबिरा बाहेरील नागरीकांनी सुद्धा समाजसवेच्या या उपक्रमात सहभाग नोंदविला. या प्रसंगी वैद्यकीय अधीक्षक डॉ.दिनेश राठोड, डॉ.सुरेश खोडवे, डॉ.चकोर रोकडे, समुपदेशक विजय ओझा आणि इतर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आरोग्य विषयक मार्गदर्शन केले.

शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ.उपाध्याय तर प्रमुख पाहुणे म्हणून जनहित मंच वर्धाचे अध्यक्ष सतीश बावसे आणि सहसचिव पाटणकर, वकारे, मुख्याध्यापक फरकाडे, तंटामुक्ती समिती अध्यक्ष राकेश वाधवा उपस्थित होते.

कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.गोपाल हेलोंडे यांच्या मार्फत आयोजित शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रबोधनकार प्रशांत कुमरे, प्रा.प्रविण पाटील, भिडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक शंकर फरकाडे आदींनी सहकार्य केले. शिबिराचे गट नायक योगेश येनकर आणि गट नायिका पूजा काळे यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन केले.

देशोन्नती वर्धा / गुरुवार, दि.७ जानेवारी २०१६




# श्रमसंस्कार शिबिरातून जनजागृती....

देवळी : एस.एस.एन.जे. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमाने भिडी येथे स्वच्छतेसाठी युवक या संकल्पनेवर आधारीत सात दिवसीय वार्षिक निवासी श्रम संस्कार शिबिर आयोजीत करण्यात आले होते. या श्रमसंस्कार शिबिर विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

सकाळ
वर्धा, शुक्रवार,
८ जानेवारी २०१६

पत्र देऊन जमिनीच्या प्रकाराबाबतची वास्तविक माहिती पर्यावरण व वन

माहिती अधिकारात

थांबविण्याचे आदेश ... दिले.

# युवकांमध्ये देश घडविण्याची शक्ती

## प्राचार्य डॉ. उपाध्याय : भिडी येथे एसएसएनजे महाविद्यालयाचे संस्कार शिबिर

सकाळ वृत्तसेवा

वर्धा, ता. ७ : युवकांमध्ये मोठी शक्ती असून त्यांना विधायक वळण दिल्यास अनेक चांगली कामे होऊ शकतात. कारण त्यांच्यामुळेच देश घडू शकतो, असे मत प्राचार्य डॉ. सुरेश उपाध्याय यांनी व्यक्त केले.

भिडी येथे एसएसएनजे महाविद्यालयाच्या संस्कार शिबिराप्रसंगी ते बोलत होते. यावेळी रासेयोचे विभागीय समन्वयक डॉ. राजीव जाधव, पंचायत समिती सदस्य श्रीधर लाभे, उपसरपंच नितीन दिघाडे व अन्य मान्यवर उपस्थित होते.

विनोद खोब्रागडे यांनी स्वच्छता ...



वर्धा : ग्रामस्वच्छता करताना एसएसएनजे महाविद्यालयाचे विद्यार्थी.

संजय इंगळे तिगावकर यांनी अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीबद्दल मार्गदर्शन केले. प्रा. मोहन गुजरकर यांनी ग्रामस्वच्छतेचे महत्त्व पटवून सांगितले. प्रा. मोहन सोनूरकर, अजय वानखेडे, प्रा. रणजित कांबळे, जीवन चोरे, अजय तिगावकर, गजानन भोरे, प्रशांत कुमरे, डॉ. दिनेश राठोड, डॉ. सुरेश खोडवे, डॉ. चकोर, विजय ओझा यांनीही विचार व्यक्त केले.विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रम सादर करून गावकऱ्यांचे प्रबोधन केले. समारोपीय कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. उपाध्याय, सतीश बावसे, श्री. पाटणकर, वकारे, मुख्याध्यापक फरकाडे, राकेश बाधन्रा व अन्य मान्यवर उपस्थित होते. आयोजनासाठी डॉ. गोपाल हेलोंडे, प्रा. प्रवीण पाटील, प्रशांत काळे, नितीन वानखेडे, विपुल ताडाम, आशिष गावंडे, स्वप्नील राऊत, विशाल धपके, शंकर फरकाडे यांनी सहकार्य केले. योगेश येनकर व पूजा काळे यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाचे नियोजन केले.